Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
May - 2019 Special Issue - 191

# जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य


अतिथी संपादक :
**डॉ. ताहेर एच. पठाण**
मराठी विभाग प्रमुख
आधुनिक भारतीय भाषा विभाग
अलिगढ मुस्लीम विद्यापीठ, अलिगढ, उत्तर प्रदेश

विशेषांक सहसंपादक :
**प्रा.मुश्ताक अहमद झरगर**
कश्मीरी विभाग प्रमुख
**डॉ. अमीना खातून**
बंगाली विभाग प्रमुख

संपादन सहाय्यक :
**जालिंदर येवले**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग

मार्गदर्शक :
**प्रा. क्रांति पाल**
चेअरपर्सन,
आधुनिक भारतीय भाषा विभाग
अलिगढ मुस्लीम विद्यापीठ, अलिगढ, उत्तर प्रदेश

मुख्य संपादक :
**डॉ. धनराज धनगर (येवला)**




Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

UGC Approved Journal
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
Global Impact Factor (GIF)

RESEARCH JOURNEY Special Issue - 191 May - 2019

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019


| | | | |
|---|---|---|---|
| 27 | वैश्वीकरण के दौर में हिंदी पत्रकारिता का बदलता स्वरूप | अरुण रंजन | 119 |
| 28 | वैश्वीकरण के दौर की हिंदी कविता में प्रतिरोध का स्वर | आशीष कुमार तिवारी | 123 |
| 29 | आदिवासी समाज पर वैश्वीकरण का प्रभाव और हिंदी कहानियों में उसका चित्रण | पूजा रानी | 128 |
| | **मराठी विभाग** | | |
| 30 | जागतिकीकरणाच्या परिणामांची दाहक वास्तवता मांडणाऱ्या काही कादंबऱ्या | डॉ. ताहेर एच. पठाण | 134 |
| 31 | जागतिकीकरणात तंत्रज्ञानाचा मराठीवरील प्रभाव | अश्विनी माने | 138 |
| 32 | समकालीन साहित्याचे बदलते संदर्भ | डॉ. राजीव यशवंते | 142 |
| 33 | जागतिकीकरणाचा ग्रामीण साहित्य व बोलीवरील प्रभाव | डॉ. राखी सलगर | 147 |
| 34 | जागतिकीकरण मराठी भाषा व बोलीभाषा | डॉ. आकाश पवार | 151 |
| 35 | कृषीसंस्कृतीतील बोलीभाषांचे जतन व व्यवस्थापनाचे आव्हान | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 155 |
| 36 | जागतिकीकरणाचे ग्रामीण कादंबरीत उमटलेले प्रतिबिंब | डॉ.रामचंद्र झाडे | 159 |
| 37 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | करुणा गायकवाड | 161 |
| 38 | अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरणाचे प्रतिबिंब | प्रा.अरविंद भराडे | 166 |
| 39 | नव्वदोत्तर मराठी कविता : विशेष संदर्भ 'ठसे बदललेल्या मुक्कामावरून' | मदन जाधव | 169 |
| 40 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | बाबासाहेब जाधव | 173 |
| 41 | मराठी ग्रामीण कादंबरीत जागतिकीकरणाचे उमटलेले पडसाद | जालिंदर येवले | 178 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Estd. 1953

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019


| | | | |
|---|---|---|---|
| 27 | वैश्वीकरण के दौर में हिंदी पत्रकारिता का बदलता स्वरूप | अरुण रंजन | 119 |
| 28 | वैश्वीकरण के दौर की हिंदी कविता में प्रतिरोध का स्वर | आशीष कुमार तिवारी | 123 |
| 29 | आदिवासी समाज पर वैश्वीकरण का प्रभाव और हिंदी कहानियों में उसका चित्रण | पूजा रानी | 128 |
| | **मराठी विभाग** | | |
| 30 | जागतिकीकरणाच्या परिणामांची दाहक वास्तवता मांडणाऱ्या काही कादंबऱ्या | डॉ. ताहेर एच. पठाण | 134 |
| 31 | जागतिकीकरणात तंत्रज्ञानाचा मराठीवरील प्रभाव | आश्विनी माने | 138 |
| 32 | समकालीन साहित्याचे बदलते संदर्भ | डॉ. राजीव यशवंते | 142 |
| 33 | जागतिकीकरणाचा ग्रामीण साहित्य व बोलीवरील प्रभाव | डॉ. राखी सलगर | 147 |
| 34 | जागतिकीकरण मराठी भाषा व बोलीभाषा | डॉ. आकाश पवार | 151 |
| 35 | कृषीसंस्कृतीतील बोलीभाषांचे जतन व व्यवस्थापनाचे आव्हान | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 155 |
| 36 | जागतिकीकरणाचे ग्रामीण कादंबरीत उमटलेले प्रतिबिंब | डॉ.रामचंद्र झाडे | 159 |
| 37 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | करुणा गायकवाड | 161 |
| 38 | अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरणाचे प्रतिबिंब | प्रा.अरविंद भराडे | 166 |
| 39 | नव्वदोत्तर मराठी कविता : विशेष संदर्भ 'ठसे बदललेल्या मुक्कामावरुन' | मदन जाधव | 169 |
| 40 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | बाबासाहेब जाधव | 173 |
| 41 | मराठी ग्रामीण कादंबरीत जागतिकीकरणाचे उमटलेले पडसाद | जालिंदर येवले | 178 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1953

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019

# समकालीन साहित्याचे बदलते संदर्भ

डॉ. राजीव यशवंते
मराठी विभागप्रमुख
गुरूबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा
मो. क्र. ८७८८२८४६२१

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याचा सामान्यपणे मागील दशकासंदर्भात विचार करताना एक गोष्ट कबूल करावी लागते की, साहित्य हे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीपासून दूर जात आहे. यापूर्वीच्या काळातील दशकभराच्या साहित्याचा विचार करताना चळवळीच्या शेवटचा अविष्कार या काळातील साहित्यातून होत होता. या काळातील मराठी साहित्याचे स्वरूप आणि चळवळ ही दलित साहित्य, ग्रामीण साहित्य आणि आदिवासी व थोड्याफार प्रमाणात स्त्रीवादी चळवळीच्या खांद्यावर असल्याचे दिसत होते. मात्र पुढे या चळवळी क्षीण झाल्या आणि गेल्या दशकभरातील साहित्य हे परत एकदा व्यक्तिकेंद्रित व पांढरपेशी जाणिवांत अडकून पडलेले दिसून येते. लेखक ग्रामीण असो किंवा शहरी, स्त्रीवादी असो त्यांच्या लेखनातील सामाजिक बांधिलकी प्रतिक्रियेच्या स्वरूपात, उथळपणे आणि कृत्रिमपणे व्यक्त होताना दिसते. म्हणून आजचे साहित्य हे परिवर्तनाच्या चळवळीचा कोणताही अविष्कार सजीवपणे करताना दिसत नाही. ज्या काळात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य अत्यंत जोमाने निर्माण होत होते त्या काळात अन्य मागासलेल्या समाजांतूनही अनेक लेखक, कलावंत साहित्यनिर्मिती करीत होते. आजच्या काळात लेखकाचा सामाजिक स्तर कोणताही असला तरी विषयाचे फरक वगळता जाणिवांचे स्वरूप हे मध्यमवर्गीय रचनाबंधातून व्यक्त होताना दिसते. म्हणून आजच्या साहित्यातून समाजाला परिवर्तनाच्या दिशा दाखविण्याची किंवा समाजात परिवर्तनाचा संघर्ष उभा करण्याची शक्ती दिसत नाही. लेखक हे लेखक होण्यासाठी लेखन करतात; कवी होऊन वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी धडपडतात मात्र साहित्याच्या, समाजाच्या आणि व्यवस्थेच्या सखोल संवेदना साहित्यातून सापडत नाहीत. अर्थात केवळ नकारात्मक दृष्टिने साहित्याकडे बघायचे की काहीतरी सहानुभूती दाखवायची या प्रश्नातून साहित्याकडे पाहातानाही साहित्यावर फारसा परिणाम होणार नाही. कारण या साहित्याला नकार देणारी चळवळ जवळच्या काळात निर्माण होण्याच्या शक्यता नाही आणि सहानुभूतीने साहित्याचा विकास होण्याऐवजी ते अधिकच खुजे होण्याचा धोका असतो.

समाजामधले ज्वलंत प्रश्न संपलेले नाहीत. ज्वलंत प्रश्नांच्या धगीतून साहित्य निर्माण होते असे मांडले तर तसेही चांगले साहित्य निर्माण होताना दिसत नाही. याचे उत्तर कदाचित हेही असू शकते की, समाजाला त्यांचे ज्वलंत प्रश्न सोडवण्याचे साहित्याशिवाय अन्य मार्ग सापडले असतील आणि ते सोयीचे व सहज वाटले असतील म्हणूनही ज्वलंत प्रश्नांच्या धगीची संवेदना वाङ्मयीन जाणिवेच्या रूपातून साहित्याद्वारे व्यक्त होताना दिसत नाही. भा. ल. भोळे यांनी अशीच एक तक्रार एका लेखातून व्यक्त केली आहे की, सवंग प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीचा सोपा मार्ग म्हणून काही आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेले लेखक उदयास आले. त्यांना प्रश्नांची जाण नव्हती, चळवळीचे भानही नव्हते आणि वैचारिक दृष्टिही नव्हती. केवळ सवंग प्रतिष्ठा मिळविण्याचा सोपा मार्ग म्हणून या क्षेत्रात लेखक आले आणि त्यांनी वाचकांचे मनोरंजन केले. स्वतःला लेखक म्हणून प्रतिष्ठा मिळवून घेतली मात्र साहित्यातून सामाजिक जाणिवा बाहेर झाल्यात.

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने बदलत आहे. दारिद्र्याचे निकषही बदलू लागले आहेत. जगण्याच्या संदर्भातील प्रश्न व त्यांची तीव्रता बदलली आहे. म्हणून आर्थिक धगीचे परिणाम साहित्यात येत नाहीत

Co-ordinator
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani 431511 (M.S.)
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019

सामाजिक परिवर्तन गेल्या अर्धशतकात वेगाने झालेले आहे. राजकीय स्वार्थापोटी समाजात जाती मजबूत बनवल्या जाताना दिसतात; परंतु व्यवहारिक पातळीवर जातीबंधने ठिसूळ झालेली आहेत. याची अनेक कारणे असून मुख्यत: दोन कारणे आहेत. एक शिक्षणाचा प्रसार वेगाने झालेला आहे आणि दुसरे आर्थिक पर्याय काही प्रमाणात उपलब्ध झालेले आहेत; परंतु समाजाच्या सगळ्याच स्तरांवर आर्थिक प्रश्न तीव्र नाहीत असे नव्हे, तर त्यांचे संदर्भ बदललेले आहेत. म्हणून आजच्या काळामध्ये दलित कवितेतील जाती आणि दारिद्र्याची तीव्रता आज व्यक्त होताना दिसत नाही. दलित लेखक आत्मकथने आजही लिहीत आहेत; परंतु अभिव्यक्तीचा रूपबंध जात आणि आर्थिक घटकांपासून अलग होताना दिसतो. ग्रामीण साहित्यामध्येही 'पाचोळा' किंवा 'धग' सारखा संघर्ष असलेलली कथानके येताना दिसत नाहीत. तर उलट परंपरेच्या प्रेमाकडे लेखक वळताना दिसतात. परंपरेच्या प्रेमातून परिवर्तनाचे भान जोपासता येत नाही. संत साहित्यातून त्या काळाच्या पार्श्वभूमीवर जोपासनेतून भक्तिचळवळ उभारता आली. आज संपूर्ण देशातील समाजावर अनेक प्रकारची व्यापक संकटे असूनही इतका प्रचंड आवाका व वैचारिकता असलेली शक्तिमान चळवळ निर्माण होण्याची चुणूकही आजच्या साहित्यातून दिसत नाही.

समाजाच्या गरजा बदलतात; मात्र संघर्षाची तीव्रता कधीच कमी होत नाही. म्हणूनच संघर्षाच्या तीव्रतेतून लेखकाचे मन तावून–सुलाखून निघायला हवे. बहिणाबाई चौधरींच्या पुढे ग्रामीण कविता जात नाही. रूपे वेगळी असली तरी व्यापक आवाका तिच्यातून व्यक्त होत नाही. कवितेमधून विषय केंद्र बनतात. व्यापक जाणिवा त्यांच्यातील अनेक रूपांसह व्यक्त होत नाही. कवितेमधून विषय केंद्र बनतात. व्यापक जाणिवा त्यांच्यातील अनेक रूपांसह व्यक्त होत नाही. रुचिपालटासारखे नवे विषय आले म्हणून साहित्याच्या विकास प्रक्रियेला साधा धक्काही लागत नाही. खरे तर समाजामध्ये अनेक प्रकारचे नवनवे साहित्यप्रवाह किंवा परिवर्तनवादी नवनव्या जाणिवा व्यक्त करणारे वेगळे साहित्य सतत निर्माण होत राहायला हवे; परंतु जागतिकीकरणाच्या आकर्षक भुलभूलैय्यामध्ये नवी मने अडकून पडलेली दिसतात आणि कुठल्याही प्रकाराचं देशीय भान आकलन न करता सवंग विषयांची शब्दरचना असलेले लेखन बाजारात दिसते. मनाला यामुळे कितीही दु:ख वाटले तरीही हे सत्य स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही.

आपल्याला विषय मिळावेत म्हणून कलावंताने समाजाला संघर्षाच्या खाईत लोटण्याची अपेक्षा करता येत नाही. येणाऱ्या काळातील येऊ घातलेली संकट समजून घेतल्याशिवाय आणि सामाजिक परिवर्तनाचे संदर्भ काळाच्या अनुरूप बनवल्याशिवाय समाजातील प्रश्नांचे स्वरूप आकळत नाही. ते आकळले तरच वेगळे साहित्य किंवा खऱ्या अर्थाने समकालातील सामाजिक भान असलेले व समाजाला संघर्षासाठी आणि परिवर्तनासाठी नवी दिशा देऊ शकणारे साहित्य निर्माण होऊ शकेल. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याची आणि पर्यायाने कृषिप्रधान भारतीय समाजाच्या एकूणच साहित्याची मर्यादा एके ठिकाणी स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते ग्रामीण लेखकांचे अनुभवविश्व अजुनही पुरेसे व्यापक झालेले नाही. त्यांना ग्रामीण समाजाचे कृषिकेंद्रित असणे अजुनही नीट आकलन झालेले नाही. एखाददुसरा अपवाद वगळला तर चांभार, कुंभारापासून कोल्हाटी–कैकाड्यांपर्यंत सर्वच घटक ग्रामसंस्कृतीशी, कृषिजीवनाशी बांधलेले असतात हे कुणी लक्षात घेतललेले दिसत नाही. प्रत्यक्षात शेती करणाऱ्या शेतकरी समाजाच्याही पलीकडे ग्रामीण भागात प्रचंड मोठा आणि विस्तृत समाज पसरलेला आहे. त्याचीही दखल ग्रामीण साहित्यिकांनी घेतली पाहिजे. जातीय अलगाव, विरफळलेल्या समाजातील विविध घटकांचे नातेसंबंध, विविध जातीजमातींमधील जातीय ... ग्रामीण भागातील दलितांचे प्रश्न इ. चे वास्तव दर्शन अजुनही ग्रामीण साहित्यातून ...

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019

भूमिकेतून त्यांनी व्यक्त केलेली खंत आणि मर्यादा आजही मराठी साहित्याच्या अभिव्यक्ती रूपाला समजून घेताना तशाच लागू पडताना दिसतात.

भारताची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आणि मिश्र स्वरूपाची होती. त्यामधून विकासाला गती नव्हती असे मानले तरी बऱ्याच अंशाने आत्मनिर्भरता होती असे मानता येते. परंतु राजकीय अधोगतीच्या काळात व दूरदृष्टीचे नेतृत्व नसलेल्या काळात ती व्यवस्था निष्क्रिय झाली. भारतीय राष्ट्रवाद हा पुरोगामीत्वात स्वातंत्र्यानंतर घडत गेलेली एक नवी परिणती होती व त्यातून एक नवे राष्ट्रीय निर्भरता स्थिर झालेली होती. असे असतानाही सत्तर ते नव्वदच्या काळात ही व्यवस्था निष्क्रिय होऊन राष्ट्राचे सामाजिक अस्तितत्व धोक्यात आल्यासारखे वाटत होते. यापुढे ग्लोबल व्यवस्थेशी भारतीय अर्थव्यवस्था जोडून जगाच्या आर्थिक नीतीचे सूत्र स्वीकारून आपण मुक्तअर्थव्यवस्था अंगिकारली. मुक्तअर्थव्यवस्था कोणत्याही अर्थाने मालकधार्जिणी, व्यक्तिकेंद्रित व नफेखोरीचे मूल्य असलेली भांडवलदारी व्यवस्था असते. राष्ट्रीय समाज, सामाजिक विकास हे तिचे मूलभूत ध्येय नसते. अशी व्यवस्था विकासासाठी गतिमान व योग्य वाटत असली आणि उच्चदर्जाचे राहणीमान हा तिचा गाभा असला तरी सामुहिक विकास तिच्या केंद्रस्थानी कधीच नसतो. म्हणूनच एक सत्य दोन दशकानंतर स्पष्ट झाले की अशा व्यवस्थेचे सामाजिक परिणाम न दिसता व्यक्तिनिष्ठ परिणाम म्हणून समोर येतात. याची दोन उदाहरणे म्हणजे महाराष्ट्रातील आणि इतरही राज्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या व आजकाल होत असलेल्या कोवळ्या वयातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या.

जेव्हा वरील प्रकारच्या समस्या या सामुहिक किंवा सामाजिक परिणाममूल्य म्हणून विचारात घेतल्या जात नाही आणि केवळ व्यक्तिपरिणाम या अर्थाने अशा समस्यांकडे पाहिले जाते तेव्हा या समस्यांची तीव्रताही कमी होते आणि साहित्यासारख्या कलारूपातून त्यांची अभिव्यक्तीही होत नाही. यासाठी असे म्हणता येईल की मुक्तअर्थव्यवस्था स्वीकारताना कृषिप्रधान भारतीय अर्थनीती व भारतीय समाजव्यवस्था यांच्यावरचे परिणाम विचारात घेऊन स्वतंत्रपणे त्याचे व्यवस्थापन व्हायला पाहिजे होते. असे न झाल्याने आणि मुक्तअर्थव्यवस्थेचे केवळ फायदे आणि तेही ज्यांच्याकडे ते फायदे उपटण्याची क्षमता आहे त्यांनाच फायदे होतात याचा साकल्याने विचार न झाल्याने दूरगामी परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. जेव्हापर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या किंवा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या यांच्याकडे राष्ट्रीय आणि सामाजिक समस्या म्हणून पाहिले जात नाही तेव्हापर्यंत त्या आत्महत्यांना व्यक्तिनैराश्याच्या कल्पनेतून पाहिले जाऊन सामान्यांवर सतत अन्यायच होत राहील. म्हणजेच भारतीय कृषिप्रधानता ही मुक्तअर्थव्यवस्थेचे पायाभूत सूत्र बनवले गेले आणि राष्ट्रनिर्भरता असे सूत्र न मानता आत्मनिर्भरता असे मुख्य सूत्र अर्थनीतीत असले तर या समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग सापडू शकतो असे अमर्त्य सेन यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांना वाटते.[३]

भारतीय अर्थव्यवस्था, समाज आणि साहित्य असे तिहेरी संबंध मराठी साहित्याने गेल्या पन्नास वर्षात घट्ट केले होते. परंतु १९६० पूर्वीच्याच पांढरपेशी चेहऱ्याच्या चक्रासारखेच चक्र आजच्या साहित्याला वेढत असलेले दिसते. म्हणून नव्यानेच समाजाच्या आजच्या जीवनव्यवस्थेला व समाजाच्या जगण्यापुढच्या समस्यांना समजून घेण्याची गरज आहे. तरच नैराश्याच्या नव्या गर्तेत अडकत असलेल्या समाजाला बाहेर काढण्याची शक्ती देणाऱ्या जाणिवा साहित्यातून व्यक्त होऊ शकतील. केवळ साहित्याचे विषय किंवा साहित्याचे क्षेत्र वाढून सामाजिक समस्या साहित्यातून येऊ शकणार नाहीत. आजच्या साहित्यातील नेमके वास्तव हेरताना म. सु. पाटील म्हणतात, "या पार्श्वभूमीवर असे वाटू लागते की नागर माणसांच्या जगण्यात आता कादंबरीला अनुरूप असे काही उरलेले नाही. त्याचा बाह्य जगाबरोबरील संबंध जिव्हाळ्याचा राहिलेला नाही. त्याचे जे

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019

स्वेतर विश्व आहे ते औपचारिक संबंधांवर उभे आहे. मालक–सेवक, साहेब–हाताखालचा माणूस, गिऱ्हाईक दुकानदार, रोगी–डॉक्टर असे संबंध बरेचसे कामापुरते असतात. नवरा–बायको आणि फार तर मुलगा–मुलगी अशा चतुष्कोनी वा त्रिकोणी संबंधाच्या पलीकडे जिव्हाळ्याचे संबंध आता उरलेले नाहीत. आज जीवनाला आलेली गती मित्रमैत्रिणीबरोबरीला नाती फार काळ टिकू देत नाही. तिशी ओलांडताना ही नातीही विरळ होऊ लागतात आणि जिव्हाळ्याच्या कौटुंबिक नात्यांतही यांत्रिकता येत जाते. त्यामुळे माणसाचे जगच फार खुरटे, छोटे भावविरल होत जाते. पूर्वी घराण्यातील सगळी माणसे जशी एका शरीराच्या अवयवांसारखी जोडलेली असायची तशी आता ती उरलेली नाहीत. त्यामुळे महाकाव्याला अनुरूप मानवी संबंधांचाच आज दुष्काळ पडला आहे. उत्कटत्वाने आपले म्हणावे असे कोणी उरलेले नाही की कोणाशी कोणाचे हाडवैरही नाही. गेला दिवस आपला म्हणत आजची चौकोनी वा त्रिकोणी कुटुंबे आपले कोमट जिणे जगत आहेत."[४]

वरील आशय हाच आजच्या साहित्याचा मुख्य पाया बनू पाहात आहे. त्यामुळे अशा साहित्याकडून आजच्या तीव्र समस्या साहित्यातून व्यक्त होण्याची अपेक्षा बाळगणे निराश करणारे आहे. म्हणून समकालीन साहित्यातून आजचे वास्तव व्यक्त होत नाही व आजचे साहित्य त्यापासून आपल्या वाङ्मयीन अहंकाराची कलात्मक भूक भागवण्यासाठीच निर्माण होत आहे की काय अशी शंका यायला लागते.

खरे तर सामाजिक अस्मिता अशी समूह कल्पना आजच्या समाजातून बाद होत आहे, असे मानता येते. किंवा सामाजिक अस्तित्व अशी समूहजाणीवही साहित्यातून बाद होताना दिसते. त्याची जागा व्यक्तिअस्मिता किंवा व्यक्तिअस्तित्व अशा कल्पना घेताना दिसतात. अशा प्रकारचे निराश करणारे चित्र आजच्या साहित्यातून व्यकत होताना पाहायला मिळते. एका लेखामधुन भा. ल. भोले यांनी हे वास्तव अत्यंत प्रखरपणे सांगितलेले आहे. अस्तित्वाचे प्रश्न मागे पडून अस्मितांच्या प्रश्नांना सार्वजनिक जीवनात प्राधान्य देण्याचे या काळाचे दुसरे एक पुससूत्रही पकडण्याचा अभावानेच प्रयत्न मराठी सारस्वतांच्या हातून झालेला आढळतो. किंबहुना जनजाणिवांचे स्वरूप किती व्यामिश्र व बहुआयामी असते याचा सूक्ष्म वेधच कधी मराठी लेखकांना घ्यावासा वाटत नाही. जनसमूहांच्या अस्मिता जणू काही स्थिर व निश्चित स्वरूपाच्या संरचना असतात हे समजून त्याचा ठोकळेबाज ऊहापोह करणाऱ्या कित्येक लेखनकृती मराठीत दाखवता येतील. बहुतेक राजकीय कादंबऱ्यांमधून हाच प्रकार झालेला असल्यामुळे जिवंत माणसांपेक्षा लेखकाच्या मनातील पूर्वनिर्धारित प्रारूपांमध्ये बसवलेले जनसमूहच आपल्याला त्यात भेटतात. माणसांची अस्मिता ही एक प्रक्रिया असते. विविध आग्रहांतून, अभिनिवेशांतून, वाटाघाटींतून आणि बचावांतून ती अभिव्यक्त होते. विशिष्ट काळाच्या संदर्भात घडणाऱ्या कृती आणि आविष्कृतीतून परस्परव्यापी प्रतीकांच्या स्वरूपात साकार होणाऱ्या या अस्मितांची तीव्रता व घनता त्या त्या समुहापुढील खऱ्या व कल्पित संकटांच्या गांभीर्यानुरूप असते. श्याम मनोहरांसारखा एखादा अपवाद वगळता कोणत्याच मराठी लेखकाने समूहजाणिवेचा हा गुंता नीट लक्षात घेऊन सोडवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही.[५]

या भूमिकेतून एकुण मराठी मन, वास्तव व मराठी साहित्याचे आजचे रूप स्पष्ट होते आणि असे मान्य करता येते की, मराठी साहित्य हे आपल्या समकालीन समाजाला व समकालीन समाजाच्या तीव्र समस्यांचे आकलन करून जाणिवेत मुरवून ते साहित्यातून अभिव्यक्त करण्यात अपयशी ठरत आहे आणि आपल्या बांधिलकीपासून दूर जात आहे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1969

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 191- जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
May-2019

संदर्भ :

१. भा. ल. भोळे, साहित्य प्रत्यय, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ. १२९
२. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, प्रस्तावना, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००७, पृ. २५
३. आर्थिक विषमताएं, राजपाल अॅण्ड सन्स, १९९९, पृ. ४०
४. साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध, शब्दालय प्रकाशन, २००१, पृ. १८८
५. साहित्य प्रत्यय, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ. १२५

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1993

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani